# महाराष्ट्र शासन

**क्र.संकेत-१०१२/७१६/प्र.क्र.१६०/२०१२/भाषा-३,**
मराठी भाषा विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
नवीन प्रशासकीय भवन,
८ वा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
**दिनांक : २७.१२.२०१२.**

**प्रति,**

सर्व प्रशासकीय विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

**विषय : मराठी संकेतस्थळ स्पर्धा - २०१३**
**शासकीय संकेतस्थळांच्या सहभागासंदर्भात.**

संदर्भ : राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांचे दिनांक १३.१२.२०१२ चे प्रसिध्दीपत्रक.

सोबत जोडलेल्या संदर्भाधीन प्रसिध्दीपत्रकाचे कृपया अवलोकन करावे.

२. मराठी भाषा विभागांतर्गत राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांनी सिडॅक, मुंबई यांच्या सहकार्याने **"मराठी संकेतस्थळ स्पर्धा-२०१३"** या स्पर्धेचे आयोजन केले आहे. सदर स्पर्धा शासकीय संकेतस्थळे व इतर संकेतस्थळे अशा दोन गटांमध्ये घेण्यात येणार आहे. सदर स्पर्धेकरीता **दिनांक १८.१२.२०१२ ते दिनांक १८.०१.२०१३ या कालावधीमध्ये** राज्य मराठी विकास संस्थेच्या http://www.rmvs.maharashtra.gov.in/rmvs तसेच सिडॅक, मुंबई यांच्या http://www.cdacmumbai.in या संकेतस्थळांवर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या दुव्यावर आपला सहभाग नोंदवावयाचा आहे.

३. या स्पर्धेमधील शासकीय संकेतस्थळे या गटांतर्गत सर्व प्रशासकीय विभाग तसेच त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालयांनी मोठया प्रमाणात भाग घ्यावा व मराठी संकेतस्थळांच्या स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळावा याकरीता मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभागांना या पत्राव्दारे आवाहन करण्यात येत आहे. तसेच सदर विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांनी या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविण्याबाबत त्यांना अवगत करण्यात यावे, ही विनंती.

४. सदर पत्र व प्रसिध्दीपत्रकाची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर "**नवीनतम संदेश**" तसेच http://intranet.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर **"संदेश फलक"** या शीर्षकाखाली उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**( ललिता शि. देठे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**सहपत्र - वरीलप्रमाणे.**

क्र.गा.५.

D:\Bhasha-3(1)\Sanketsthal Spardha-2013.doc

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

**राज्य मराठी विकास संस्था**
(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय,
३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१.
रजि नं. एफ १६०९४ (मुंबई)
दूरध्वनी : २२६३१३२५/ फॅक्स : २२६५३९६६
Email : rmvs_mumbai@yahoo.com

क्र. आस्था/ ६४२ /रामविसं/२०१२
दिनांक : १३/१२/२०१२

प्रसिद्धीसाठी

**मराठी संकेतस्थळांची स्पर्धा - २०१३ विषयीचे निवेदन**

अलीकडे संगणकावर मराठीतून माहितीची देवाणघेवाण करण्याचे प्रमाण वाढले आहे. शासनातील विविध विभागांकडे असणारी माहिती लोकांना सहज उपलब्ध व्हावी ह्यासाठी प्रयत्न होत आहेत. कला, क्रीडा, संस्कृती, विज्ञान, अर्थव्यवहार अशा विविध विषयांवरील माहिती आज मराठीतून संगणकावर उपलब्ध होऊ लागली आहे. ह्या व्यवहाराला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने राज्य मराठी विकास संस्थेने ह्यापूर्वी २००६ आणि २०१०,२०१२ ह्या वर्षात मराठी संकेतस्थळांची स्पर्धा आयोजित केली होती. ह्या स्पर्धांना उत्तम प्रतिसादही लाभला होता. म्हणून ह्या वर्षीही सीडॅक, मुंबई ह्यांच्या सहकार्याने राज्य मराठी विकास संस्था 'मराठी संकेतस्थळांची स्पर्धा २०१३ ' ही स्पर्धा आयोजित करत आहे.

ही स्पर्धा यंदा दोन गटांत घेण्यात येईल. १. **शासकीय संकेतस्थळे** आणि २.**इतर संकेतस्थळे** असे दोन गट असतील. "शासकीय संकेतस्थळे" ह्या पहिल्या गटासाठी पहिले, दुसरे,तिसरे, असे अनुक्रमे १५,०००, १०,००० आणि ५,००० रुपयांचे पुरस्कार देण्यात येतील. "इतर संकेतस्थळे" ह्या दुसऱ्यागटासाठी पहिले, दुसरे, तिसरे असे अनुक्रमे ३५,०००, २०,००० आणि १५,००० रुपयांचे पुरस्कार देण्यात येतील.

दि. १८/१२/२०१२ पासून दि. १८/०१/२०१३ पर्यंत http://www.rmvs.maharashtra.gov.in/rmvs ह्या राज्य मराठी विकास संस्थेच्या संकेतस्थळावर तसेच http://www.cdacmumbai.in ह्या सीडॅक, मुंबई ह्यांच्या संकेतस्थळावर ऑनलाइन प्रवेशपत्रिका उपलब्ध करून देण्यात येईल.

वरील कालावधीत स्पर्धकांनी ऑनलाइन प्रवेशपत्रिका संपूर्ण भरून स्पर्धेतील सहभाग नोंदवायचा आहे.

संकेतस्थळासाठी वापरलेली प्रमाणके (स्टॅण्डडर्स), वापरलेला टंक (फॉण्ट), संकेतस्थळाची तांत्रिक गुणवत्ता, वापरासंबंधी पुरवलेल्या सोयी, उपयुक्तता, अद्ययावतपणा, वापरकर्त्यांना सहभागाची सोय (इण्टरॲक्टिव्हनेस), माहितीची मांडणी, भाषेचा दर्जा, माहितीचा संग्रह इत्यादी निकषांवरून तज्ज्ञ परीक्षकांकडून सहभागी संकेतस्थळांचे परीक्षण करण्यात येईल.

शासनाचे विविध विभाग तसेच विविध विषयांवर संकेतस्थळे निर्माण करणाऱ्या व्यक्ती, संस्था इत्यादींनी ह्या स्पर्धेत मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे असे आवाहन राज्य मराठी विकास संस्थेतर्फे करण्यात येत आहे.

आपला,

(गिरीश पतके)
प्रभारी प्रशासकीय अधिकारी